सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

मे-२०२२ वर्ष -३, अंक-७

कार्यालय - संत एकनाथ नगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७

## सेवक संघ विशेष वृत्त

### सेवक संघाचे नवीन सनदी लेखापालाची नेमणूक

सेवक संघाचे जमा-खर्चाचे हिशोब ठेवणे, तपासणे, अंकेक्षण अहवाल व नफातोटा पत्रक बनविणे इ. कामी श्री. सुयश सहस्त्रबुध्दे यांची सनदी लेखापाल म्हणून नेमणूक केली आहे. ते १-४-२२ पासून काम सुरू केले असून सर्व शाखानी मासिक रोखलेखे त्यांना पाठविणे सुरू केले आहे.

### सेवक संघ संकेतस्थळ देखभाल

www.mahasevaksangh.com या सेवक संघ महाराष्ट्रचे संकेत स्थळावर सेवक संघाच्या विशेष वृत्तांत, सेवक वार्ता इत्यादी माहिती अपलोड करण्यास श्री. विवेक डावरे यांना ऑक्टोबर २०२१ पासून सुद्धा प्राधिकृत केले होते.ते काम ते करतही हाते. परंतु श्री. विवेक डावरे वैयक्तिक विविध व्यापामुळे या कामास वेळ देऊ शकत नसल्याबाबत त्यांनी असमर्थता व्यक्त केली. आता यापुढे हे काम पुणेस्थित सदस्य श्री. उमेश धोपेश्वरकर हे उस्फूर्तपणे काम करत आहेत. त्यांचेकडे संकेतस्थळावर प्रकाशित करावयाची माहिती सदस्य इमेलव्दारे पाठवू शकतात. श्री. विवेक डावरे यांनी सेवक संघाच्या कामात दिलेल्या अमोल योगदानाबद्दल केंद्रीय कार्यकारी मंडळाने आभार व्यक्त केले.

### सेवक संघाचे अमरावती शाखेचे सक्षमीकरण

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे अमरावती शाखेकरीता HP कंपनीचा नवा कलर प्रिंटर रु.11900 चा खरेदी करण्यात आला.यामुळे शाखेच्या कामात गतिमानता येण्यास मदत होणार आहे.**

### धुळे शाखा विशेष उपक्रम

धुळे वन वृत्तातील नंदुरबार वन विभागातील काही गावांसाठी सामूहिक वन हक्कव्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे आलेल्या मागणीवरून श्री एस के गवळी अध्यक्ष, सेवक संघ, धुळे शाखा यांनी दिनांक 24 मे 2022 रोजी श्रीमती मनीषा खत्री, जिल्हाधिकारी धुळे यांची त्यांचे कार्यालयात उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग श्री. के. बी. भवर यांच्यासोबत भेट घेतली व त्याबाबत चर्चा केली. जिल्हाधिकारी यांनी प्रायोगिक तत्वावर 3 गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत सूचना दिल्या. त्यानुसार लवकरच पुढील कार्यवाही उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग योचेकडून करण्यात येईल. या भेटी दरम्यान सेवक संघाचे शहादा येथील सदस्य श्री. आर.एम. शास्त्री यांच्या सोबत होते या कामी श्री व्ही.टी. पत्की सर यांचे नेहमीप्रमाणे मार्गदर्शन लाभले आहे.

•••••••••••••••••••••••••••••

### कार्यकारी मंडळ बैठक वृत

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाची बैठक झाली नाही.**

---

### मेळघाटीचे लोकविश्वास व लोककथा

संकलक व लेखक-वि. त्र्यं. पत्की,
भा.व.से. (निवृत्त) भ्रमणध्वनी: 98226 78649
ई मेल: patkivithal27@gmail. com

गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली वन विभाग महाराष्ट्रातील वनांची काशी, तर अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्र वनांचे रामेश्वर म्हणून ओळखले जाते. चिखलदरा व धारणी तालुक्यातील, सातपुडा पर्वत रांगातील डोंगराळ प्रदेशास मेळघाट संबोधले जाते. मला या वन काशीत ८ वर्षे व वन रामेश्वरात ४.५ वर्षे सेवा करण्याची संधी मिळाली.

या अंकात . . . . .

१. सेवक संघाच्या नवीन सनदी लेखापालांची नेमणूक...१
२. सेवक संघ संकेतस्थळ देखभाल ..........१
३. अमरावती शाखेचे सक्षमीकरण ..........१
४. धुळे शाखा विशेष उपक्रम ..........१
नवी लेख मालिका ..........१
५. मेळघाटीचे लोकविश्वास व लोककथा

हा लेख, मी माझे परम प्रिय मित्र व. गुरूवर्य कै. रमेश वासुदेव गणोरकर यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी करण्यासाठी संकलन केला आहे. याचे मूळ लेखक "बाबासाहेब गणोरकर"असून, त्यांचे लेखास रंग-रंगोटी करण्याचे काम करण्याचा प्रयत्न मी केला आहे. बाबासाहेब एका मध्यम वर्गीय ब्राह्मण कुटुंबात जन्मलेले साधे, सरळ, निष्ठावंत होते. व्यवसायाने ते शारीरीक शिक्षण देणारे शिक्षक होते. त्यांचे मूळ गाव मध्य प्रदेशातील बेतुल जिल्ह्यातील, भैसदेही तालुक्यातील, मानी हे आदिवासी बहुल क्षेत्र होते. त्यांना "कोरकू" भाषा उत्तम अवगत होती. त्यांचे बहुतेक मित्र आदिवासी कोरकू समाजातील होते. ते एक चांगले पत्रकार, लेखक व निसर्गप्रेमी होते. अमरावती जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक पदावर ते ६ वर्षे कार्यरत होते. कोरकू व कोला (वाघ) त्यांचे जीव की प्राण होते. मी, त्यांचेकडून आदिवासी समाज व वन्यजीव व्यवस्थापनाचे बारकावे शिकलो. दुर्दैवाने त्यांना दि. २८-१२-२०१० साली देवाज्ञा झाली.

भारतातील अनेक राज्यात लोककथा आणि लोकविश्वासांचा साठा आहे.त्यात शिक्षित व अशिक्षित आणि आदिवासी व बिगर आदिवासी यांच्या कल्पना, समजुती यांचे साम्य व विरोधाभास आहे.

परंतु आदिवासी बांधवांवर अंधश्रध्दा, भ्रामक कल्पना, विचित्र समजुती यांचा विलक्षण पगडा आहे.

आदिवासी गुराखी व शिकारी यांचेजवळ वनवाचन व वन्यजीव विषयक ज्ञानाचा प्रचंड साठा आहे. त्यांचे ज्ञान अनुभवाचे आहे. त्यांना शिक्षण नाही पण उपजत बुध्दी आहे.

कोरकू समाज धर्मभोळा, देवावर व दैवावर विश्वास ठेवणारा, श्रध्दाळू, रूढी व परंपरेला चिकटून राहणारा आहे. पाप आणि पुण्याच्या संकल्पनेवर ठाम आहे. त्याच्यावर भूत-प्रेत, सैतान, भुमका, परिहार, हडळ यांचा विलक्षण प्रभाव आहे. त्यातून तो सहसा बाहेर पडत नाही;कारण त्याला लोकगंगा व जात गंगेची विलक्षण भीती असते. कोणताही दैवी प्रकोप होऊ नये म्हणून कोरकू आपल्या कुटुंबासाठी व गावाच्या भल्यासाठी बळीची प्रथा पाळतो, त्यात दारु, कोंबडा व बकरा हे प्रमुख घटक असतात. त्यांच्या विविध विधीत भावईपूजा शेडोली, घट, पांचवी, मेघनाद, लग्न, मृत्यू इत्यादी विधी येतात.

आता काही लोकविश्वास पाहू या. इंग्रजीत ज्याला नाईटजार, मराठीत रातवा आणि कोरकू भाषेत टापु म्हणतात, हा निशाचर असून, कबुतरा येवढा असून जमिनीवरच घरटे बांधतो. हा पक्षी निशाचर असल्याने, दिवसा दिसत नाही व चुकुरचक आवाज काढतो. कोरकुंचा असा विश्वास आहे की टापु पक्षी पाळीव प्राण्यांच्या शिंगांवर, मानेवर, कंबरेवर बसला तर त्या प्राण्याला शिंगमोडी, मानमोडी वा कंबरमोडी रोग होतो. घुबडाला जर मोहाची दारु पाजली तर घुबड माणसाप्रमाणे बोलू लागते. खवल्या मांजराचे अंगावर असलेल्या खवल्यापैकी एक खवला जर कंबरेला बांधला, तर कंबरदुखी बरी होते. खवल्या मांजरास कोरकू भाषेत खुडबूस म्हणतात. जर पाऊस पडत नसेल तर कडुलिंबाच्या पाल्यामध्ये बेडकाला बांधून ती काठी घेऊन गांवभर नाचतात. त्यामुळे पाऊस येतो अशी त्यांची धारणा आहे.

डोकुच्या नावाच्या पक्षाला गोटा मारला आणि तो पक्षी जर मेला नाही तर तो डोकुचा पक्षी तोच गोटा नदीकाठी जाऊन आपल्या चोचीने घासतो. ज्याप्रमाणे गोटा घासल्याने झिजतो, त्याचप्रमाणे गोटा मारणारा देखील झिजून मरतो अशी त्यांची श्रध्दा आहे. एखादेवेळी कोंबडा रात्री अरवला तर असे अरवणे अशुभ समजून तो कोंबडा कापतात व फेकून देतात.

Gloriosa superb किंवा टायगर लिली/कळलावी/झगडीन फूल पावसाळी फुलते. कोरकू या फुलास हात लावत नाही; कारण त्यातून घरात भांडण होते अशी त्यांची समजूत आहे.

भर उन्हाळ्यात आवर्त वारे वाहतात. त्यामुळे झोपडीवरचे गवत व कडबा उडतो. या वस्तु उडून जाऊ नयेत म्हणून सरडा (गेको) मारून त्याला टांगून ठेवतात. त्यामुळे झोपडीवरील कडबा, गवत उडून जात नाही अशी त्यांची श्रध्दा आहे. या प्रकाराला कोरकू भाषेत माटू म्हणतात.

सरड्याने रंग बदलून लाल केला तर पाऊस येतो अशी कोरकूची समज आहे. डोक्यावर सुंदर तुरा आणि लांब पिसांचा सोगा पसरलेला मोर किती सुंदर दिसतो नाही ?त्याचा नाच देखील सुंदर असतो. पण असा नाचणारा "नाच्या मोर" नपुसंक असतो असे कोरकू समजतात. त्यांचे मतानुसार असा नाच्या मोर नपुसंक असल्याने तो आपली प्रजा निर्माण करू शकत नाही, तर प्रजा निर्माण करणारा मोर लांडोरी सारखा असतो. त्याला कोरकू भाषेत कडावु म्हणतात. तरीही आपण अशा नाच्या पक्ष्याला आपला राष्ट्रीय पक्षी का म्हणतो ?

उधईची राणी जर जीवंत गिळली तर गेलेली ताकत परत येते असे कोरकूना वाटते. रानडुकराचा दात मिरचीच्या पीकात ठेवला तर मिरचीचे पीक भरपूर येते असा कोरकूचा समज आहे. सापांची कामक्रिडा चालू असतांना त्यावर एक पांढरा कोरा कपडा व एक रुपया टाकला तर पैशाची कधीच ददात राहात नाही असे कोरकूना वाटते.

कावळ्याची मिथूनक्रिडा पाहिल्यास, आपल्या घरातील कोणाचा तरी मृत्यू होतो असा समज आहे. ज्याने कावळ्याची कामक्रिडा पाहिली असेल त्याने तोंडी व लेखी कोणाला तरी कळवावे की तुझ्या घरी मृत्यू झाला आहे. म्हणजे आपल्या कडील मृत्यू टळून दुसऱ्या कडे मृत्यू होतो अशी त्यांची श्रध्दा आहे.

वाघाच्या बाबत बोलणेच नको. वाघाच्या मिशीत विष असते अशी त्यांची ठाम निष्ठा आहे. ग्वाल्हेरचा राजमान्य शिकारी मजीतखां हा वाघ मारल्यानंतर मिशी जाळून टाकत असे. वाघाचे लकी बोन व नख ताईत म्हणून ते गळ्यात घालतात. वाघाची हाडे दारूत मिसळतात. वाघाबाबत अंधविश्वास या कल्पनेसाठी इंडिया टुडे दि.३१-०७-१९८७ अंकातील पान क्र. १४८ मधील श्री श्री दिलीप अवस्थी यांचा "टायगर्स इन ट्रबल्स" हा लेख वाचनीय आहे.

एखाद्या महत्वाच्या कामासाठी घरातून बाहेर पडल्यावर वाघ, तांडगा, कोल्हा दिसला तर अशुभ मानतात. तसेच कुत्रा व कावळा मातीत लोळतांना दिसल्यास आरिष्ट येणार असे समजले जाते. मुंगुस, उजव्या हाताकडील कावळा, कोकीळ, पावशा, बुलबुल यांचे दर्शन ते शुभ मानतात. कुत्र्याचे विव्हळणे, घुबडाचा घुत्कार अशुभ समजतात. सांबर, मोर, वानर, टिटवी यांचे विशिष्ट प्रसंगी काढलेले आवाज धोक्याची सूचना समजून ते सावध व सतर्क होतात.

एक कोरकू दुसऱ्या कोरकूस त्याचे मूळ नावाने हाक न मारता, टोपण नावाने हाक मारतो. कोरकूच्या गोत्र निर्मितीची कथा मजेदार आहे. एकदा भगवान शंकर ध्यानस्थ बसले असता काही वात्रट मुलांनी त्यांना त्रास दिला. तेंव्हा शंकराने रागावून त्या मुलांकडे नजर टाकली असता मुले घाबरून पळाली व लपलीत. जी मुले मातीच्या ढिगाऱ्याचे जवळ लपली त्यांचे गोत्र कासदा झाले. जी मुले पाण्याजवळ, पानांचे आड, गवतात, झाडाजवळ लपलीत, त्यांची गोत्रे अनुक्रमे दारसीम, साकोम, झारा, सेंज झाली. या गोत्रांवरुन त्यांची आडनांवे देखील कासदेकर, दारसीमे, साकोमवार, झारेकर, जांबेकर अशी पडलीत.

एकदा पार्वतीने शंकराला रात्री स्वयंपाक करायला इंधन नाही म्हणून लाकडे आणण्यास जंगलात पाठविले. सायंकाळ झाली तरी अजून शंकर घरी परतले नाही म्हणून पार्वती घाबरली व आपल्या कुत्र्यास तिने शंकराकडे पाठविले. शंकराला पाहताच कुत्रा भुंकू लागला.

पुढील अंकात चालू.....

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक- सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी